महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३), पुणे यांचे कार्यालय

राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे – १८

दुरध्वनी क्र. ०२०- २७४२०७१७ 99314 ई मेल- drcspune3@gmail.com

जा.क्र.उनिपुश3/गृह/कलम १५४ बी२७ (१) /निर्देश/२०२० दिनांक :- 30/ ०९ /२०२१

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ बी २७ (१) अन्वये निर्देश)**

**वाचले :**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ बी २७ (१) मधील तरतूदी

२. श्री प्रणिल प्रकाश हुंडेकर यांचा दिनांक ०४.०५.२०२१ रोजीचा अर्ज

३. या कार्यालयाकडील जा.क्र./उनिपुश३/गृह/कोहिनुर शांग्रीला/श्री हुंडेकर दिनांक १०.०५.२०२१ चे सुनावणी पत्र.

**प्रस्तावना**

ज्या अर्थी, कोहिनुर शांग्रीला सहकारी गृहरचना संस्था मर्या., पिंपरी, पुणे -१८ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक पीएनए/पीएनए३/एचएसजी/(टिसी)/८४८९/२००७ दिनांक १०/०४/२००७ असा आहे. आणि.

ज्या अर्थी, उक्त् वाचले क्रमांक २ अन्वये कोहिनुर शांग्रीला सहकारी गृहरचना संस्था मर्या., पिंपरी, पुणे -१८ श्री प्रणिल प्रकाश हुंडेकर या संस्थेचे सभासद यांनी या कार्यालयास दिनांक ०४.०५.२०२१ रोजी केलेल्या तक्रार अर्जास अनुसरुन या कार्यालयात दिनांक ०५.०८.२०२१, व दिनांक १२.०८.२०२१ रोजी सुनावण्यात ठेवण्यात आल्या. आणि,

ज्या अर्थी,सदर सुनावण्यांमध्ये तक्रादार श्री प्रणिल प्रकाश हंडेकर यांच्या तर्फे ( कुलमुखत्यार श्री प्रकाश हुंडेकर ) उपस्थित होते आणि जाबदेणार संस्थेमार्फत इमेल द्वारे नोटिस मिळुनही गैरहजर आणि,

ज्या अर्थी, या सुनावणी दरम्यान अर्जदार श्री प्रणिल प्रकाश हंडेकर यांच्या तर्फे ( कुलमुखत्यार श्री प्रकाश हुंडेकर ) यांनी लेखी म्हणणे सादर केले की,

१. कोहिनुर शांग्रिला सहकारी गृहरचना संस्था मर्या या संस्थेचे दिनांक ०१.०४.२०१६ रोजी नोदणी . परंतु पदाधिका-यानी संस्था स्थापनेपुर्वीच्या कालावधीचा म्हणजे नोव्हेंबर २०१५ ते मार्च २०१६ हया कालावधीचा मेंटेनस सुद्धा वसुल केला आहे. बिल व्याजासह लावत

आहेत. हे वसुन करताना सरसकट न करता फक्त डी आणि ई बिल्डींगच्यांच सभासदांकडुन वसुन केलेला आहे.

२. संस्थेच्या पदाधिकारी यांना बिल्डर ने ( Authority Letter ) दिलेले आहे . आसे सांगण्यात येते. सदर ( Authority Letter ) ची मागणी केली असता ती आज अखेर सभासद यांना दिलेली नाही.

३. जर बिल्डर ने सोसायटी स्थापने पर्यंतची सगळी बिले भरली आहेत तर संस्था स्थापनेपुर्वीच्या कालावधीचा मेंटेंनन्स वसुलीचे प्रयोजन का करण्यात येते.

४. जर बिल्डरचा सांगण्यावरुन पुर्वीच्या कालावधीचा मेंटेंनन्स वसुल केला तर बिल्डर कडे जमा असलेले आधीचे पैसे संपले का? हयासाठी बिल्डर कडुन काही हिशोब घेतला होता कि ? अश्याप्रकारे हिशोब घेणे ही पदाधिका-यांची जबाबदारी नव्हती का ?

५. जर बिल्डरच्या सांगण्यावरुन तथाकथित पत्राच्या आधार घेऊन डी आणि ई बिल्डींगच्या सभासदांकडुन पुर्वीच्या कालावधीचा मेंटेंनन्स कमिटी/ पदाधिकारी वसुल करतात तर बिल्डर कडे बाकी असलेल्या सी बिल्डींग मेंटेंनन्स का वसुल केला नाही.

६. कमीटी जर बिल्डर च्या सांगण्यावरुन काहीही खातरजमा न करता तसेच पुर्वीचा कोणताही हिशोब न घेता सभासदांकडुन वसुल करत तरी सभासदांचा बाकी असलेल्या मेंटेंनन्स पण वसुल करण्याची जबाबदारी कमिटी/ पदाधिकारी नाही का ?.

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर (३)

७. सोसायटी स्थापनेनंतरच्या कालावधीचा म्हणजेच एप्रिल २०१६ ते नोव्हेंबर २०१६ साठीचा मेंटेनन्स का वसुल केला नाही? जर डी आणि ई बिल्डींगच्या सभासदांकडुन संस्था स्थापनुपर्वीच्या कालावधीचा मेंटेंनन्स नोटीश पाठवुन २१% व्याजासहीत वसुल केला आहे तर सी बिल्डींग कडुन का वसुल केला नाही.

८. MOU मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे कि, " कलेक्ट केलेला मेंटेनन्स रु ८७,७००००/- हा Entire Project साठी Collect केला आहे आणि तो तीन ही बिल्डींग साठी एकत्रित खर्च केला आहे ." म्हणजेच जर डी आणि ई बिल्डिंग मेंटेनन्स नोव्हेंबर २०१५ पासुन वसुल करताहात तर सी बिल्डिंग चा मेंटेनन्स सुद्धा नोव्हेंबर २०१५ पासुनच वसुल करणे आवश्यक आहे. आणि.

ज्या अर्थी अर्जदार यांच्या लेखी म्हणणे व दाखल कागदपत्रानुसार .

१. संस्थेला सस्था स्थापने पूर्वीच बिल्डरकडे देय असलेली थकबाकी आकारण्याचा अधिकार नाही.

२. संस्थेने राज्य शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग सगृयो-१०९६/प्र.क्र.१३७/१४-स दिनांक २९ एप्रिल २००० रोजीचा आदेश व संस्थेच्या मंजुर उपविधी मधिल क्र. ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, चा अनुपालन केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही, आणि,

त्याअर्थी, सदरहू पध्दती देखभाल शुल्क आकारणी व वसुल करणे हे प्रथमदर्शनी चुकीची असल्याने संस्थेच्या पदाधिका-यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ शासन आदेश तसेच संस्थेच्या उपविधीतील तरतूदींचे पालन करणे बाबत महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे १५४ ( बी ) २७ (१) अन्वये संस्थेला निर्देश देणे आवश्यक असल्याची खात्री झाल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे १५४ बी २७ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, शाहूराज हिरे, उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर (३) पुणे , कोहिनुर शांग्रीला सहकारी गृहरचना संस्था मर्या., पिंपरी, पुणे -१८ या संस्थेचे संचालक मंडळ व सचिव यांना निर्देश देतो की,

१. संस्थेला संस्था स्थापने पूर्वीचे म्हणजेच बिल्डरकडे फलॅट धारकांचे देय असलेली थकबाकी आकारणी करण्याचा अधिकार नाही. सबब अशा प्रकारची वसुली करु नये.

२. संस्थेने राज्य शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग सगृयो-१०९६/प्र.क्र.१३७/१४-स दिनांक २९ एप्रिल २००० रोजीचा आदेश व संस्थेच्या मंजुर उपविधी मधिल क्र. ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, तरतूदींचे पालन करुन देखभाल शुल्क व संस्थेस देय असलेल्या शुल्कांची आकारणी करावी व तसा अहवाल १५ दिवसांचे आंत या कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक ३०/०९/२०२१ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

(शाहूराज हिरे) 30.9.2021
उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (३), पुणे

प्रति,

१. मा.चेअरमन/सचिव, कोहिनुर शांग्रीला सहकारी गृहरचना संस्था मर्या., पिंपरी, पुणे -१८
२. श्री प्रणिल प्रकाश हुंडेकर , कोहिनुर शांग्रीला सहकारी गृहरचना संस्था मर्या., पिंपरी, पुणे -१८